स्थायी समितीच्या **शुक्रवार** दिनांक 02–08–2013 रोजी दुपारी 03–00 वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## उपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | श्री.अविनाश निळकंठ ठाकरे | सभापती |
| 2. | श्री. पुरूषोत्तम नागोराव हजारे | सदस्य |
| 3. | डॉ. प्रशांत रसपाल चोपडा | सदस्य |
| 4. | श्री.राजेश श्रावण घोडपागे | सदस्य |
| 5. | सौ.रीता अशोक मुळे | सदस्या |
| 6. | सौ. वंदना विनोद इंगोले | सदस्या |
| 7. | सौ. विषया विकास खोब्रागडे | सदस्या |
| 8. | श्री.किशोर चिधुंजी गजभिये | सदस्य |
| 9. | सौ. भावना संतोष लोणारे | सदस्या |
| 10. | श्री. राहुल सुखदेव तेलंग | सदस्य |
| 11. | सौ. मायाताई चितांमण इवनाते | सदस्या |
| 12. | श्री. देवेंन्द्र महादेव मेहर | सदस्या |
| 13. | श्री. अमान उल्लाह खान व. अब्दुल मजीद खान | सदस्य |
| 14. | सौ. सिमा सुनिल राऊत | सदस्या |

## अनुपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | श्री.सुरेश दामोधर तळवेकर | सदस्य |
| 2. | श्रीमती मिना दिलीप चौधरी | सदस्या |

## उपस्थित अधिकारी

1) श्री. हेमंतकुमार पवार, अपर आयुक्त

2) श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

<u>ठराव क्रमांक 89</u> :— प्रभाग क्र. 41 येथे गांधी कन्या म.न.पा.शाळेच्या जागेवर स्पोर्टस् कॉम्प्लेक्सचे बांधकामास्तव प्राप्त 5 निविदा पैकी मे. दीप कंस्ट्रक्शन, यांची प्राकलनीय दरापेक्षा 4.07 टक्के कमी दराची रु. 1,46,83,577/— राशीच्या निम्नतम निविदेस स्थायी समिती ठराव क्र. 75 दिनांक 15.06. 2013 अन्वये मंजुरी प्राप्त आहे. मात्र, मा. आयुक्त, यांचे दि. 08.05.2013 चे आदेशान्वये दिनांक 10 मे, 2013 पासून निविदा सादर करण्यास मे. दीप कंस्ट्रक्शन यांना पुढील एक वर्ष प्रतिबंध केलेला आहे. सदर ठराव कार्यान्विती करण्यास्तव मा. आयुक्त, यांना सादर केला असता ही बाब स्थायी समिती समोर ठेवण्याचे निर्देश प्राप्त आहेत.

सबब, सदर बाब स्थायी समिती समोर ठेवण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्याची नोंद घेऊन विषय कार्यालयास परत करण्यास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 90</u> :— प्रभाग क्र. 40 अ,ब, गांधीबाग येथील विविध रस्त्यांचे डांबरीकरण करण्याचे कामास्तव प्राप्त 3 निविदांपैकी मे. मुकेश कंस्ट्रक्शन, यांची प्राकलनीय दरांपेक्षा 1.01 प्रतिशत कमी दरांची रु.29,69,088/— रकमेची निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 91</u> :— नागपूर महानगरपालिकेमध्ये GIS based identification of new propoerties and assessment of existing properties with benefits to other departments in more revenue generation using Remote sensing कार्यान्वीत करण्यासाठी मे. आर्यश सॉफ्टवेअर प्रा.लि.पुणे यांची रु. 1,11,40,833/— एवढया राशीचा प्रस्ताव ई—गव्हर्नन्सचे वाढीव काम म्हणून त्यांनी सादर केलेल्या अटी व शर्तीवर स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 92</u> :— नागपूर महानगरपालिका अंतर्गत BSUP-JNNURM योजने अंतर्गत केंद्र शासनाचे 130 CSMC बैठक दि. 23.03.2013 अन्वये मंजूर व महाराष्ट्र शासन गृहनिर्माण विभागाचे दि. 6जुलै 2013 चे पत्रान्वये मंजूर घरांचे बांधकाम करण्याचे व निविदा मंजूर करण्याचे व त्यासाठी म.न.पा. चा हिस्सा रु. 6.86 कोटीची तरतुद मंजुर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन कार्यालयाने सादर केलेल्या प्रस्तावात U.L.B. च्या म.न.पा. च्या हिस्याची विस्तृत माहिती दिली नाही व कार्यालय याची योग्य स्पष्टता करु शकले नाही. करीता विस्तृत माहिती स्थायी समिती समोर ठेवण्यास माहिती सादर करण्यास्तव प्रस्तावित विषय पुढील स्थायी समितीच्या सभेत सादर करण्यास कार्यालयास परत करण्यास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

श्री. किशोर गजभिये :— मा. अध्यक्ष महोदय, बी.एस.यु.पी अंतर्गत काम करीत आहे याचे डिटेल्स काय आहे याची माहिती विभागाने दयावी

मा. सभापती :— प्रशासनातर्फे बी.एस.यु.पी. मध्ये कोणकोणती कामे प्रस्तावीत आहे त्या कामाची डिटेल माहिती दयावी.

श्री. होतवाणी :— मा. अध्यक्ष महोदय, 6 झोपडपट्टयामध्ये सी.एम.कडून 130 मंजूर झालेली कामे आहेत. मंजुर झालेल्या कामापैकी प्रत्येक स्लम मध्ये 75 घरे बांधावयाची आहेत.

मा. सभापती :— कुठल्या कुठल्या स्लम मध्ये ही योजना राबवित आहे.

श्री. होतवाणी :— मा. अध्यक्ष महोदय, सेवादलनगर, संजय गांधी नगर, लुंबीनी नगर, न्यु पांढराबोळी, बेझनबाग येथे बी.एस.यु.पी अंतर्गत काम सुरु आहे.

डॉ. चोपडा :— मा. अध्यक्ष महोदय या स्लम च्या लिस्ट मध्ये दुसरे नाव होते का ते कॅन्सल झाले. त्याचे काही सब डिव्हीजन आहे का?

मा.सभापतीः— एकुण किती स्लम साठी टेण्डर काढले होते

श्री. होतवाणी :— मा. अध्यक्ष महोदय, सेवादल नगर, संजय गांधी नगर,लुंबीनी नगर, न्यापांढराबोडी, बेजन बाग या साठी टेण्डर काढले होते.

श्रीमती लोणारे :— माझ्या प्रभागामध्ये श्रावस्तीनगर या वस्तीचे टेण्डर झाले म्हणून वर्तमानपत्रामध्ये बातमी आली आहे.

मा. सभापती :— पब्लीक नोटीस किती स्लम करिता पाठविली. तेव्हा किती असोसिएटचे लोक आले आणि किती ठिकाणचे प्रस्ताव केले.

श्री. होतवाणी :— मा. अध्यक्ष महोदय, श्रावस्तीनगर करिता असोसिएटने निगोसिएशन न केल्यामुळे त्यांचा प्रस्ताव आला नाही. पांढराबोळी, सेवादल नगर, संजय गांधी नगर, बेझनबाग, लुंबीनीनगर या स्लमकरिता पाठविण्यात आले.

मा. सभापती :— आपण एका ठिकाणी प्रस्तावीत केले आहे. मग दुसऱ्या ठिकाणी सेकंड लोवेस्टला देण्यास काय हरकत आहे ?

श्री. होतवाणी :— मा.सभापती, सेम ऑफर असल्यामुळे बोलाविले होते. त्यामुळे दिले आहे.

मा. सभापती :— नस्ती पाहत असतांना संजय गांधी नगर स्लम चे आहे त्याच्यामध्ये टोटल प्राकलन राशी 5 करोड 21लक्ष 120 घरांसाठी साठी दिली होती त्या नंतर 75 घरांवर आल्याने अंदाजे ती राशी 3 करोड 26 लक्ष 12 हजार 70 हजार रुपये अशी होत असतांना 3 कोटी 32 लक्ष अशी आकडेवारी दिसत आहे. हा 6 लक्षाचा फरक दिसत आहे. हा डिफरन्स दिसत आहे त्यामुळे 65 हजार 603 रुपयांनी यु.एल.बी.चा शेअर वाढतांना दिसत आहे.

श्री. होतवाणी :— मा.सभापती, आपले म्हणणे बरोबर आहे आम्ही जी किंमत प्रस्तावित केली आहे ती 120 घरांची 3 कोटी 32 लाख रुपयांची आहे ती 75 घरांची सरासरी किंमत आहे. यामध्ये तीन टाईपचे घरे बांधायचे आहे त्यामध्ये क्लस्टर ची किंमत आहे हे प्रस्तावित केले आहे.

मा. सभापती :— नस्ती मध्ये असे कुठेही दिसत नाही चर्चे वरुन जरी अभिप्रेत होत असले कि क्लस्टर वाईज रेटचे फिगर आहे. परंतु नस्ती मधे कुठेही नोंद नाही. या मुळे पुढे चालून ऑडीट ऑब्जेक्शन येण्याची शक्यता वाटते.

श्री. होतवाणी :— मा. अध्यक्ष महोदय, ती माहिती देता येईल.

श्री किशोर गजभिये :— मा. अध्यक्ष महोदय, नोटीफाईड स्लम मध्ये याच्या आधी एस. आर.ए. ची स्किम राबवित होते. आता ते काम बंद झाले आहे. आता सावित्री बाई फुले नगरमध्ये विकासाची कामे करता येणार नाही का?एसआरएची कामे बंद झाली आहे. आता 25 घरे बांधून देणार आहे. त्यामुळे किती तरी प्राब्लेम आला आहे. याची माहिती देता येईल काय?

श्री. होतवाणी :— मा. अध्यक्ष महोदय, या आधी डि.पी.आर. मंजुर करुन काम सुरु करण्यात आले होते. प्रस्तावीत कामाकरिता एन.आय.टी ने एन.ओ.सी. दिली होती. त्या प्रस्तावाचे डि.पी.आर मंजुर झाले परंतु प्रत्यक्ष काम करीत असतांना ती जमीन खाजगी मालकाची निघाली. कोर्टाने खाजगी मालकाच्या बाजूने निकाल दिला. खाजगी जमिनीवर एसआरए स्किम राबवायची असेल तर जमिनीची किंमत त्या मालकाला दयावी लागेल. आता 25 घरांचे काम मंजुर झाले आहे ते करीत आहे.

श्री. किशोर गजभिये :— मा. अध्यक्ष महोदय मालकाच्या बाजुने निकाल लागला असलाएन.आय.टी त्या मध्ये काही पत्र दिले का आपण काम थांबवावे.

श्री. होतवाणी :— संबंधीत माणसाने नोटीस दिली आहे.

किशोर गजभिये :— मा. अध्यक्ष महोदय, एन.आय.टी कडुन एन.ओ.सी. घेतली आहे त्यानंतर आपण तेथे बांधकाम चालु केले एन.आय.टी ने आपल्याला काही नोटीस दिली होती का की आपण काम थांबवावे असे काही पत्र पाठविले का? मा. अध्यक्ष महोदय एस.आर.ए. स्कीम ला सर्व झोपडपटटीवासीयांचा विरोध होता. त्यांनंतर संबंधीत अधिकारी व नगरसेवकांची महापौरजी यांनी बैठक घेतली होती. त्यानंतर नगरसेवकांनी ज्या भागात विरोध आहे त्या भागात जावुन प्रत्येक नागरिकांना समजावुन सांगितले व लोकांना कनव्हेन्स केले व त्यानंतर 100 लोक स्किम राबविण्यास तयार झाले. आता त्यांना 25 घरे बांधून देत आहे तर बाकी लोकांनी काय करावे. त्यामुळे आम्ही त्या भागात पाय ठेवू शकत नाही तेथे आमची अधिका—यांनी गोची केली आहे. आधी माहिती असती तर आम्ही गेलो नसतो. आमचे झोपडे कधी बांधून देणार असे लोक आम्हांला विचारत आहे.

श्री. होतवाणी :— जागेचा निर्णय लागत नाही तो पर्यत ती अडचण राहणार आहे.

श्री. किशोर गजभिये :— मा. अध्यक्ष महोदय, एन.आय.टी. ने कोणतेही अधिकृत पत्र दिले नाही परस्पर ओनरने सांगितले आणि तुम्ही बांधकाम थांबविले. यावर ऑफीशियल काही प्रोसेस झाली काय?

श्री. होतवाणी :— 25 घरांचे बांधकाम झाले आहे. स्किममध्ये 550 घरे मंजूर आहेत.

श्री. किशोर गजभिये :— मा. अपर आयुक्त आपणांस या संदर्भात विनंती आहे की या संदर्भात निगम आयुक्त, एसआरएचे रामटेके साहेब, कार्यकारी अभि. होतवाणी या मध्ये काय मार्ग काढता येत असेल तो आपण काढावा अशी माझी विनंती आहे

मा. सभापती :— विषय क्रमांक 75 च्या अनुषंगाने या ठिकाणी चर्चा झाली बरेचशे मुद्दे उपस्थित झाले. या ठिकाणी आकडेवारीमध्ये शेअरच्या संदर्भात मोठा संभ्रम होता प्रशासनाकडून जे उत्तर दिले त्या प्रमाणे नस्ती मध्ये कोणत्याही प्रकारची नोंद नसल्यामुळे संभ्रम निर्माण होवू शकतो. क्लस्टर प्रमाणे त्याचे रेट ॲनॅलीसीस नस्ती मधे असणे आवश्यक आहे तरी हा विषय संपूर्ण माहिती सह कार्यालयानी सुचविल्या प्रमाणे पुढील स्थायी समितीच्या बैठकी मधे परत सादर करण्यात यावा. मा. सदस्य श्री किशोर गजभिये यांनी जो विषय मांडला प्रशासनातर्फे एनआयटीशी पत्रव्यवहार करून घरे बांधू शकतो किंवा नाही याची शहानिशा करून किशोर गजभिये यांनी जी मागणी केली या विषयांच्या संदर्भात अपर आयुक्त,एस.आर.ए चे अधिकारी यांच्या सोबत संयुक्त बैठक घेवुन या प्रकरणाचा सोक्षमोक्ष लावण्यात यावा. मा. सदस्या श्रीमती लोणारे यांनी श्रावस्ती नगरचा मुद्दा उपस्थित केला त्यावर कायदेशीर प्रक्रिया पुर्ण करून श्रावस्तीनगरच्या संदर्भात निर्णय घेण्यात यावा.

<u>ठराव क्रमांक 93</u> :— नागपूर मनपाच्या सन 2013—14 ची मालमत्ता कराची देयके कुरीयर कंपनीतर्फे वाटण्याच्या कामाचे दर व एजेन्सीज निश्चित करण्याकरिता जाहिरातीव्दारे निविदा मागितल्या असता प्राप्त निविदा संदर्भात खालील प्रस्तावास मंजुरी देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

1. या कामाकरिता प्राप्त सुधारित रु. 4.50/– प्रती मागणी देयक या निम्नतम दरास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.
2. उपरोक्त निम्नतम दरांनुसार या कामावरील अपेक्षीत वार्षिक रु. 21.69 लक्ष खर्चास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.
3. तुर्त हे काम वाटप उपरोक्त दरांवर व निविदाकारांना निर्धारित कागदपत्रे सादर करण्याच्या अटींवर करण्यास अनुमती प्रदान करणे. तसेच आवश्यकता भासल्यास शहरातील इतर इच्छुक कुरियर एजेन्सी मार्फत मंजुर निविदा अटी व दरावर करवुन घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

3

<u>ठराव क्रमांक 94</u> :– प्रभाग क्र. 55 "ब" येथे एस.ए. रोड पासुन करुणा भवन, श्री. किराणा ते सी.बी. रोड, सॅमुअल ते वेस्ट हायकोर्ट रोड येथील डांबरीकरण करण्याच्या कामास्तव रु. 39,98,635/– च्या निविदा मागविण्यात आल्या असता प्राप्त निविदेमध्ये मे.पी.एम. ए. कन्स्ट्रक्शन यांची प्राकलनीय दरापेक्षा 1.5 टक्के प्रतिशत कमी या सुधारित दराची रु. 39,38,655/– किमतीची निम्नतम निविदा स्वीकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 95</u> :– मा. सदस्यांनी सादर केलेला खालील ठराव मा. अध्यक्ष यांनी दिलेल्या निर्देशानुसार निगम सचिव यांनी स्थायी समितीच्या सभेमध्ये वाचून दाखविला व त्यास समितीने मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>–: ठराव :–</u>

स्थायी समितीच्या दिनांक 02.04.2013 च्या सभेमध्ये ठराव क्र. 32 स्थायी समितीद्वारे करण्यात आला. विषयाच्या प्रारुपामध्ये निविदाकार मे. आर. बी. गुरुबक्षानी यांच्या नावाने निविदा देण्याचा प्रस्ताव कार्यालयाने प्रस्तावित केला होता. परंतू प्राप्त झालेल्या निविदेमध्ये संबंधित विषयाचा कंत्राट आर.बी. केवलरामानी यांना देण्यात आला होता. तशी मंजूरी सुध्दा मिळालेली आहे.

करिता कार्यालयाने केलेली चुक खालील प्रमाणे दुरुस्त करण्यात येते.

ठराव क्र. 32 दिनांक 02.04.2013 मध्ये निविदाकार आर.बी. गुरुबक्षानी यांचे ऐवजी आर.बी. केवलरामानी अश्या दुरुस्तीसह स्थायी समिती एकमताने मंजूरी प्रदान करते.

सुचक – हस्ता/– डॉ. प्रशांत चोपडा
अनुमोदक – हस्ता/– श्री. किशोर गजभिये
हस्ता/– श्री. देवेन्द्र मेहर

<u>ठराव क्रमांक 96</u> :– आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

सभापती
स्थायी समिती,
महानगरपालिका,नागपूर